महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर

सेक्टर२७, मिहान पुनर्वसन वसाहत खापरी, नागपूर- ४४११०८(महाराष्ट्र)

e-mail: principal.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in • office.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. (०७१०३) २९५२२६(P), २९५२२०(O) •Website: www.gcoen.ac.in

**"To be an Institution of National Repute Creating Globally Competent Technocrats to Serve the Society"**

क्र.शाअमना/शिष्यवृत्ती/2022/ 6688(A) दिनांक : 24 NOV 2022

## शिष्यवृत्तीबाबत मार्गदर्शक सुचना – ३

प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ व थेट व्दितीय वर्ष प्रवेशित ST/SC/OBC/SBC/VJNT/EBC/MINORITY/ OPEN/SEBC प्रवर्गातील सर्व विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते की, चालु शैक्षणिक वर्ष 2022-2023 करीता आपले सरकार, महाडीबीटी प्रणालीवरील सुचनेनुसार दिनांक 15/11/2022 ते 14/12/2022 या कालावधीत सर्व योजनांचे नविन तसेच नुतनीकरण अर्ज भरणे सुरू झालेले आहेत. तसेच 2021-2022 चे विदयार्थी लॉगीनला करेक्शनसाठी पाठविलेले शिष्यवृत्ती/फ्रिशिपचे अर्ज Reapply Option उपलब्ध असल्यास दिनांक 14/12/2022 पर्यंत रि-अप्लाय (Re-apply) करायचा आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र विदयार्थ्यांनी www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी (Registration) करावे. **(नोंदणी करण्याकरीता आपला भ्रमणध्वनी क्रमांक Mobile Number आधारकार्डशी जोडणे तसेच स्वत: विदयार्थ्यांचे नावे पोस्ट ऑफिस मध्ये खाते उघडून त्यास आधारकार्डशी जोडणे (Link करणे) आवश्यक आहे.** मागील वर्षी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरलेल्या विदयार्थ्यांना पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.) नोंदणी नंतर तयार झालेल्या आय.डी. व पासवर्डचा वापर करून विदयार्थ्यांनी पात्र असलेल्या योजनेचा लाभ घेण्यासाठी www.mahadbtmahait.gov.in या वेबसाईटचे माध्यमातून ऑनलाईन स्वरूपात अर्ज करावे.

1) पोस्ट मॅट्रीकोत्तर भारत सरकार शिष्यवृत्ती 1.50 **लाख उत्पन्न मर्यादा/फ्रिशीप** 1.50 **ते** 8 **लाख उत्पन्न मर्यादा सामाजिक न्याय विभाग (OBC/SBC/VJNT प्रवर्गाकरीता)**
2) पोस्ट मॅट्रीकोत्तर भारत सरकार शिष्यवृत्ती 2.50 **लाख उत्पन्न मर्यादा/फ्रिशीप** 2.50 **लाखपेक्षा अधिक ते उत्पन्न मर्यादा नाही सामाजिक न्याय विभाग (SC/ST प्रवर्गाकरीता)**
3) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग (खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे पाल्य **(OPEN-EWS-EBC-SEBC)**
4) डॉ. पंजाबराव वसतीगृह निर्वाह भत्ता योजना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग **(खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (OPEN-EWS-EBC-SEBC अल्पभुधारक/मनरेगा नोंदणीकृत रोजगार चे पाल्य)**
5) राज्य शासन अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग **(मुस्लिम/शिख/जैन/पारसी/ख्रिश्चन/नवबौध्द)**

आवश्यक कागदपत्रे :-

1)आधारकार्ड 2)ईडियन पोस्टल पेमेंट चे बँक खाते 3)10 वी/12 वी व मागील वर्षी उत्तीर्ण सर्व Semester च्या Original गुणपत्रिका किंवा विभागप्रमुखाने साक्षांकित केलेल्या गुणपत्रिका 4)CAP ID Letter Admission Incharge यांच्या सहीचे 5)2021-2022 वर्षाचे तहसिलदाराचा सही शिक्का असलेले उत्पन्न प्रमाणपत्र (आईचे उत्पन्न प्रमाणपत्र लावत असल्यास वडील हयात नसल्याचे प्रमाणपत्र/फारकत प्रमाणपत्र/विभक्त कुटुंबाचे प्रमाणपत्र इ. 6)अधिवास प्रमाणपत्र 7)राशन कार्ड 8)टी. सी. 9)जात प्रमाणपत्र 10)शिष्यवृत्ती/फ्रीशीप धारक विदयार्थ्यांकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक 11)अपंग विदयार्थ्यांकरीता अपंगत्वाचे प्रमाणपत्र 12)वडीलांचे प्रतिज्ञापत्र 13)वसतिगृहात प्रवेशित विदयार्थ्यांनी वसतिगृहात राहत असल्याचे प्रमाणपत्र 14)डॉ. पंजाबराव वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेत असलेल्या विदयार्थ्यांना अल्पभुधारक किंवा मनरेगा नोंदणीकृत रोजगारचे प्रमाणपत्र, वसतीगृह कुलमंत्रीचे प्रमाणपत्र, बाहेर कीरायाने राहत असल्यास घरमालकाचे Stamp Paper वर Bond कालावधी नमूद करुन, घरमालकाचे आधारकार्ड व पॅनकार्ड, नोडल अधिकारी शिष्यवृत्ती, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांचे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे 256 kb साईजचे आत PDF/JPEJ Format मध्ये Scanner वर स्कॅन करुन अपलोड करावे. **(मोबाईल मधून डॉक्युमेंटस स्कॅन करु नये)**

टिप :-

1) **सदर शैक्षणिक वर्षात जे शिष्यवृत्ती/फ्रिशिप धारक विदयार्थी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरणार नाही अथवा ज्यांचे अर्ज नामंजूर होईल अशा विदयार्थ्यांनी त्या वर्षाची शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणे बंधनकारक राहील आणि ही सर्वस्वी जबाबदारी विदयार्थ्यांची राहील.**
2) **शिष्यवृत्ती/फ्रिशिप धारक विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरल्यानंतर तो स्वत: वेळोवेळी Log In करुन अर्जाची स्थिती पाहणे, अर्ज त्रूटीमध्ये आल्यास त्रूटीची पुर्तता करून पुन्हा Re-apply करणे, अर्ज मंजूर झाल्यानंतर Reedem करणे ही सर्वस्वी जबाबदारी विदयार्थ्याची राहील.**
3) **पदवि अभ्यासक्रम पुर्ण करताना अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत प्रथम वर्ष प्रवेशित विदयार्थ्यांना केवळ चार वर्ष तसेच थेट व्दितीय वर्ष प्रवेशित विदयार्थ्यांना केवळ तीनच वर्ष वरीलयोजनेचा लाभ घेता येईल Extra Year लागणा-या विदयार्थ्यांना त्या वर्षाला शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा लाभ घेता येणार नाही.**
4) **ST/SC हे प्रवर्ग वगळुन इतर सर्व प्रवर्गातील ज्या विदयार्थ्यांच्या पालकाची उत्पन्न मर्यादा 8 लाख पेक्षा जास्त असेल त्यांना कुठल्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षास पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.**
5) **TFWS मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने व्यतिरीक्त अन्य कुठलाही लाभ घेता येणार नाही. अन्य सवलतीस Apply केल्यास अर्ज रदद करण्यात येईल, तसेच रक्कम अदा झाल्यास वसुल करण्यात येईल.**
6) **Against CAP (EWS) मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.**
7) **Against CAP (ST/SC) मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.**

8) **Against CAP (OBC/SBC/VJNT) मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.**

(प्रा. पी. व्ही.नंदनकर)
नोडल अधिकारी शिष्यवृत्ती,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयायल,
नागपुर

(डॉ. रेवतकुमार बोरकर)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयायल,
नागपुर

प्रत : 1) सर्व प्रवेशित विदयार्थी, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता, देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

2) प्रोग्रामर, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना महाविदयालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.

3) विदयार्थी विभाग, सुचना फलक शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर.

4) सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची सुचना विभागाच्या सुचना फलकावर लावून तसेच विभागाच्या Whatsapp Group व्दारे आपल्या विभागातील विदयार्थ्यांना निदर्शनास आणून दयाव्यात.